Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

NEWS LETTER

## वार्तापत्र

वर्ष १ ले अंक : ४ था
जुलै–सप्टेंबर २०२२
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

## संपादकीय

जगातील कोविड ची साथ आटोक्यात येत असल्याबद्दल आपण समाधानाचा नि:श्वास सोडत असतानाच पुन्हा या साथीने डोके वर काढले आहे. 17 जून रोजी जागतिक आरोग्य संघटनेने जी आकडेवारी जाहीर केली आहे त्यानुसार आजपर्यंत संपूर्ण जगात 53 कोटी 58 लाख केसेस सापडल्या असून आजपर्यंत 53 लाख पेक्षा जास्त लोक यामुळे मृत्युमुखी पडले आहेत.

कोविड साथीपासून बचाव करण्यासाठीच्या ज्या उपाययोजना आहेत त्यांची अंमलबजावणी व्यक्तिगतरीत्या, सामूहिक रित्या आणि शासकीय पातळीवर कोविडच्या साथीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वेळेस कठोरपणे केली गेली. पण आता पुन्हा कठोरपणे अंमलबजावणी करणे अवघड आहे. कारण शाळा, दुकाने, व्यवसाय, समारंभ, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणे आता थांबवणे शक्य नाही. परंतु निदान वैयक्तिक पातळीवर तरी काळजी घेणे शक्य आहे. उदा. बाहेर जाताना मास्कचा वापर करणे, बाहेरुन घरात आल्यानंतर साबणाने हात धुणे, लसीचे पहिले दोन डोस नंतर बूस्टर डोस घेणे. एवढे तरी आपल्या हातात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारतातील फक्त 4% लोकांनी बूस्टर डोस घेतला, जर्मनी आणि फ्रान्समध्ये 60% लोकांनी बूस्टर डोस घेतला असून अमेरिकेत हे प्रमाण 30% एवढे आहे. या सर्व परिस्थितीत मायाकेअर चे स्वयंसेवक जनजागृती करीत आहेत.

आतापर्यंत माया केअरच्या सुमारे 1000 स्वयंसेवकांनी एकंदर 5000 पेक्षा जास्त लोकांना आपल्या सेवा दिलेल्या आहेत. आणि त्यांना दिलेल्या भेटींची संख्या तब्बल 13000 पेक्षा जास्त आहे. इतक्या वेळा भेटी देऊन त्यांचे जीवनमान सुधारण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. त्यांच्या जीवनात आनंदाचे अनेक प्रसंग आणले आहेत. एकंदर 1200 लोकांचे लसीकरण केलेले आहे. 14 शहरांमध्ये 55 हजार पेक्षा जास्त मास्क निशुल्क वाटप केले आहेत. आमचे एक लाभार्थी श्री सुधाकर कुलकर्णी यांनी आमच्या स्वयंसेवकांच्या मदतीने पुणे शहरातील दोन वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांच्या करमणुकीसाठी हिंदी आणि मराठी सुमधुर गीतांचा कार्यक्रम सादर केला आहे. तसेच असाच एक कार्यक्रम फेसबुक वरती लाईव्ह सादर करुन तो वेगवेगळ्या वृद्धाश्रमात दाखविला गेला. महाराष्ट्रात सुरु झालेली ही चळवळ आता भारतातील 39 शहरे आणि इंग्लंड मधील 4 शहरे यात कार्यरत झाली आहे. या संस्थेचे सर्व कामकाज करण्यासाठी बॅक ऑफिसमध्ये बिंदू समूहातील सुमारे 150 दिव्यांग अतिशय उत्तम प्रकारे काम करत आहेत.

माया केअरच्या सेवा आणि विविध उपक्रमांचे वार्तांकन नागपूर टुडे, सकाळ, लोकमत इत्यादी वृत्तपत्रे, धुळे चॅनेल तसेच विविधभारती पुणे यांनी करुन माया केअरचा वटवृक्ष विस्तारण्यात हातभार लावला. या सर्व माध्यमांचे आम्ही शतश: ऋणी आहोत.

निसर्ग मनुष्याला एखाद्या अवयवात काही कमतरता देतो, तेव्हा इतर काही गोष्टीत किंवा मानसिक क्षमतेत वाढ करुन त्यांची भरपाई करतो असे म्हणतात. याचा प्रत्यय येथे येतो. निलेश बोर्डे नावाचा एक दिव्यांग या बॅक ऑफिसमध्ये काम करतो. याने स्पेशल व्हेंचर पार्टनर (SVP) मध्ये माया केअर चे प्रतिनिधीत्व केले. आणि तो Fast Pitch स्पर्धेत रौप्य पदकाचा मानकरी ठरला. तसेच माया केअर मध्ये लोकांचा विकास या केस स्टडीमध्ये निलेश बोर्डे, अभिजीत माळी आणि अर्चना चंदणे या तीन दिव्यांगांच्या टीमने एक केस स्टडी पेपर सादर केला आहे. या केस स्टडी प्रकल्पाला ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन (AIMA) कडून उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला आहे.

उर्वरीत भाग पुढील पानावर...

या दिव्यांगाचे एकंदर तीन वेगवेगळे गट केलेले असून त्यांना व्हॉईस टीम, डाटा टीम व पॉवर टीम अशी नावे दिलेली आहेत. व्हॉईस टीम मध्ये दृष्टीदोष असलेले दिव्यांग काम करतात. डेटा टीम मध्ये श्रवणदोष असलेले दिव्यांग काम करतात तर चालण्यात फिरण्यात अडचणी असलेले दिव्यांग पॉवर टीम मध्ये काम करतात. हे सर्व दिव्यांग घरातूनच काम करीत आहेत. आणि त्यांच्या कामासाठी त्यांना प्रशिक्षणही दिले आहे. यामुळे त्यांना रोजगार उपलब्ध होऊन ते आत्मनिर्भरही बनत आहेत.

मुंबईच्या रोटरी क्लब संस्थेने आमच्या माया केअर संस्थापक श्रीमती मंजिरी गोखले जोशी आणि अभय जोशी यांना Vocational Service Award देऊन गौरविले आहे.

या सर्व सेवा देण्यासाठी आणि त्यांचा परीघ वाढवण्यासाठी मोठ्या आर्थिक सहाय्याची आवश्यकता आहे. यासाठी आमची आपणास विनंती आहे की समाजातील धनवान आणि उदार लोकांनी पुढे यावे आणि आम्हाला आर्थिक सहाय्य करावे.

## जेष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या सोयी आणि सवलती :

1) प्रधानमंत्री वय वंदन योजना – या योजनेत पेन्शन मिळू शकते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

योजनेची मुदत : 10 वर्षे

कमीत कमी पेन्शन : रुपये 1,000/- मासिक

जास्तीत जास्त पेन्शन : रुपये 9250/- मासिक

कमीत कमी गुंतवणूक : रुपये 1,62,162/-

जास्तीत जास्त गुंतवणूक : 15,00,000/-

या योजनेत 7.40% दराने पेन्शन मिळते. हि भारत सरकारची योजना असून एल.आय.सी. मार्फत राबविली जाते.

2) सिनियर सिटीझन सेविंग्ज योजना –

योजनेची मुदत 5 वर्षे

कमीतकमी वय 60 वर्षे

व्याजदर 7.40%

कमीत कमी गुंतवणूक रुपये 1,000/-

जास्तीत जास्त गुंतवणूक रुपये 15,00,000/-

व्याज दर तिमाहीला आपल्या खात्यात जमा होते. मुदत संपल्यावर पैसे आपल्या सेविंग्स खात्यात जमा होतात. सदर योजना पोस्ट खाते व बँकामार्फत राबविली जाते.

3) महाराष्ट्रातील एस.टी. महामंडळ जेष्ठ नागरिकांना साध्या व निमआराम बसच्या प्रवासासाठी बस भाड्यात 50% सुट देते तसेच शिवशाही प्रकारच्या बसमध्ये 45% एवढी सवलत मिळेल.

4) ज्येष्ठ नागरिकांना बँकेत ठेवलेल्या मुदत ठेवींवर 0.50% एवढे व्याज जास्त मिळते.

5) ज्येष्ठ नागरिकांसाठी बँकेत स्वतंत्र काऊंटर ठेवलेला असतो. किंवा त्यांची वेगळी रांग असते.

6) प्रवासासाठी मिळणाऱ्या सोयी सुविधा :–

   1) विमान प्रवास : विमान कंपन्या प्रवासासाठी च्या भाड्यात सूट देतात. एअर इंडिया सध्या 50% एवढी सूट भारतातील प्रवासासाठी देते.

   2) भारतीय रेल्वेत जेष्ठ पुरुष नागरिकांना 40% प्रवासासाठीच्या भाड्यात सूट देतात. आणि जेष्ठ वयाच्या स्त्रियांना 50% सूट मिळते.

   3) जेष्ठ नागरिकांना वैद्यकीय विम्याच्या हप्त्याच्या रकमेत रुपये 50 हजार एवढी सूट आयकरातून मिळते.

   4) जेष्ठ नागरिकांना वैद्यकीय कारणासाठी केलेल्या खर्चातून 50 हजार एवढी सूट आयकरातून मिळते.

विद्याधर जोशी पुणे

## माया केअर वृत्त :

1) दि. 10 मे 2022 रोजी कामशेत येथील Nulife या जेष्ठ नागरिकांच्या संकुलात माया केअर फाऊंडेशन च्या सेवांची माहिती देण्यात आली.
2) दि. 27 मे 2022 रोजी समर्थनम ट्रस्ट तर्फे निगडी येथे घेण्यात आलेल्या दिव्यांग रोजगार मिळाव्यात 30 दिव्यांग उमेदवारांना काम देण्यात आले. या वेळी माया केअरला स्मृतिचिन्ह भेट मिळाले.
3) पुण्यातील सहकार नगर, भोसले नगर, टेल्को कॉलनी पिंपरी, दीनानाथ मंगेशकर हॉस्पीटल या ठिकाणी माया केअरच्या सेवांची माहिती देण्यात आली.
4) माया केअरच्या संस्थापिका कै. डॉ. विद्या गोखले यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 17 मे 2022 रोजी खराडी येथील अण्णासाहेब बेहेरे वृद्धाश्रमात कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचा सुमारे 50 वृद्धांनी आनंद घेतला. त्यांना यावेळी एका कंपनीच्या सामाजिक दायित्व विभागातर्फे आंबे देण्यात आले. माया केअरच्या स्वयंसेवकांनी वृद्धांना आंबे वाटप केले.
5) जागतिक योग दिनानिमित्त 21 मे 2022 रोजी आनंदधाम वृद्धाश्रम आपटे रोड पुणे आणि देवतरु वृद्धाश्रम दांडेकर पुलाजवळ पुणे येथे आमचे स्वयंसेवक श्री अविनाश ठाणावाला यांनी दत्त क्रिया योग या विषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. सुमारे 50 वृद्धांनी त्याचा आनंद घेतला. सूत्रसंचालन स्वयंसेवक महेश कुलकर्णी यांनी केले व कार्यक्रमास स्वयंसेवक श्री संतोष महाजन आणि श्री मकरंद निमोणकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.
6) दि. 26 जुन 2022 रोजी खास माया केअर स्वयंसेवकांसाठी डॉ. सुरेश गोखले यांनी व्हिटॅमिन डी आणि व्हिटॅमिन बी–12 चे शरीराला महत्व याविषयी मार्गदर्शन केले आणि डॉ. संगमनेरकर यांनी व्यायाम प्रकाराबद्दल मार्गदर्शन केले. सुमारे 15 स्वयंसेवकांनी याचा लाभ घेतला.
7) आमच्या पुणे येथील स्वयंसेविका श्रीमती विनिता महाजन यांनी निवारा वृद्धाश्रमात " गजानन बावनी " या पुस्तकाचे पठण करुन तेथील आजींना अध्यात्मिक आनंद दिला.

## भावपूर्ण श्रद्धांजली :

आम्ही सेवा देत असलेल्या खालील जेष्ठ नागरीकांचे दु:खद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

श्री चंद्रकांत केळकर — श्री उद्धव बागुल

श्री वामनाचार्य — सौ. साधना रांगणेकर

## मंद (Excerpts)

रे जगा, कां प्रेमचश्मा बंद आहे ?
भिन्न, तरि हिस्साच तव हा वृंद आहे।
वेगळेपण मान्य नाहीं, तर तपासा
झापडांचा संच कितिसा रुंद आहे ।
थाप द्या पाठीवरी, करिं हात क्षणभर
तो पुरेसा अल्पसा–आनंद आहे।
वाढवा माझ्यात दडल्या बाळकृष्णा
व्हायचें तुम्हां यशोदा नंद आहे।

आमचे लाभार्थी श्री सुभाष नाईक (76) यांनी मतिमंद लोकांच्या व्यथेवर लिहिलेली कविता.



आमच्या स्वयंसेविका सौ. सुमंगला गोखले (82) यांनी अनुक्रमे चिकूच्या आणि पिस्त्याच्या बिया तसेच आईस्क्रीम कांड्या व पॅकिंग पेपर यापासून बनवलेल्या कलाकृती.

## लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया :

आमच्या स्वयंसेविका वीणा जोग यांचा सहवास आणि सेवा, जेष्ठ महिला श्रीमती सुनंदा बाळ यांना किती आवडतो हे त्यांनी खालील चार ओळी लिहून कळवले आहे.

सरस्वतीची वीणा झंकारली माझ्या घरी
केंद्राचे नाव सार्थ करणारी मायावती उभी दारी
नजरभेट होता गाली हसु आले
प्रेमाचे आपलुकीचे नाते लगेच जुळले.

**श्रीमती सुनंदा मोरेश्वर बाळ**
**मो. 84215252278**

मी ज्योती फिरके, हॅपी कॉलनी कोथरुड येथे राहते. माझ्याकडे माया केअरची स्वयंसेविका स्नेहल खिंवसरा येत होती. ती मला वाचून दाखवत असे. आमच्या छान गप्पा व्हायच्या. गरजेनुसार इतर वाचनही व्हायचं. तसच मला औषधे वगैरे आणायला ती सोबत करायची. ती खूप pleasing आणि गोड आहे. तिचा सहवास मला खूप आवडतो. या सेवेबद्दल मी माया केअर सेंटरची खूप खूप आभारी आहे.

**ज्योती फिरके**
**कोथरुड, पुणे**
**मो. 9420425627**

Visit of **Santosh Mahajan** on behalf of **Maya Care Foundation** was very encouraging and interesting and services offered by him are also useful particularly in present situation. Social service also enhances the knowledge of the person and broadens his mind. That is why it is called “Seva Dharma Mission” It benefits not only the person but also the man who gives his service. I am very thankful particularly due to discouraging atmosphere. It is said that God helps them who help themselves. Many people may think that it is wasteful but actually it is elevating both the person who offers the service and who receives the service. I am very grateful to Maya Care Foundation.
Thanking You
Govind Vasudev Dhere.

**C/o. Suchita Dhere**
Kothrud, Pune
Ph. **8669081938**

मी मेधा केतकर, कर्वे नगर, पुणे येथे राहते. दि. 19 जून रोजी मला स्वयंसेविका श्रीमती विनीता महाजन यांची खूप मदत झाली. आम्ही दोघी नळ स्टॉप हून बसने हडपसरला माझे डोळे तपासायला गेलो. तिथून Six Seater नी देसाई हॉस्पिटल ला गेलो व डोळे तपासले. माझ्या डाव्या डोळ्यात मोतीबिंदू झाला आहे. त्यांची मला खूप मदत झाली. मला एकटीला शक्य नव्हते. त्या सगळीकडे माझ्याबरोबर होत्या. त्यामुळे काळजीचे कारण नव्हते. माया केअर फाऊंडेशनला मनापासून धन्यवाद.

**मेधा केतकर**
**मो. 8007829996**

## माया केअर फाऊंडेशन एक अतिशय उत्तम आधारस्तंभ :

दिवसेंदिवस प्रत्येक व्यक्तीचे आयुर्मान वाढतच चालले आहे. याचे कारण एकंदर सर्वच क्षेत्रात वृद्धांना अतिशय उत्तमोत्तम सोयी, उच्च राहणीमान, मित्र मैत्रिणीचे एकंदर ग्रुप यामुळे सुखावह जीवन जगता येते आहे. परंतु हल्ली एक मुलगा व एक मुलगी आणि आई-वडिल असे छोटेसे कुटुंब असते. मुलगा पुढे यशस्वी जीवनासाठी परदेशात जातो. मुलीची देखील तीच परिस्थिती. त्यांच्या विवाहोत्तर आई वडील दोघेच एकटे राहतात. सर्व सुखे उपलब्ध असतात. परंतु सोबत मात्र नसते. आजारी पडले तर हॉस्पिटल मध्ये जाणे, डॉक्टर कडे फेऱ्या मारणे, प्रकृतीसाठी विशेष काळजी दोघांनाच एकमेकांची घ्यावी लागते. परदेशात गेलेल्या मुलांची तर महिने महिने भेट होत नाही. त्यात कोरोना सारख्या रोगाने सर्वच रस्ते बंद केले होते. त्यावेळी मात्र माया केअर चे स्वयंसेवक अतिशय नि:स्वार्थी मदत करतात. तेही सर्व नि:शुल्क ! त्यांचे आभार कसे मानावे !

मी तर त्यांना देवदूतच म्हणेन.

त्या सर्वांना आयुष्य खुप सुखाचे आणि आनंदाचे जावो अशी ईश्वराप्रती प्रार्थना करते.

**सौ. स्मिता दिलीप मानकामे**
वारजे, पुणे
मो. 9011477944

## कौटुंबिक स्वास्थ्य उत्तम ठेवण्यासाठी :

माया केअर फाऊंडेशन चे एक लाभार्थी कै. चंद्रकांत केळकर यांनी लिहिलेल्या सैरभैर पुस्तकातील एकत्र कुटुंबात दोन वेगवेगळ्या पिढ्यांचे आचरण कसे असावे याबद्दल मार्गदर्शन करणारे काही उपयुक्त विचार :

### आई-वडील, आजी-आजोबा

1) मुलांच्या आर्थिक व्यवहारात फारसे डोकावू नये. ती वाईट मार्गाने जात नाहीत ना याकडे मात्र तटस्थ राहून बारकाईने लक्ष ठेवावे.
2) मुला सुनांना उठसूठ सल्ले देऊ नका. थोडक्यात सासू-सून म्हणजे सारख्या सूचना हा वाक्प्रचार कुटुंबातून हदपार झाला पाहिजे.
3) सकाळी जरा बाहेर पडा. समवयस्कात फिरा. म्हणजे घरातील इतरांच्या दैनंदिन आन्हीके, आंघोळी यामध्ये त्यांना तुमच्या व्यत्यय येणार नाही.
4) तुमचे स्वत:चे एकेकाळचे नोकरीतील अधिकारपद हळूहळू विसरायला लागा.
5) आमच्यावेळी असे होते, तसे होते या गोष्टीचा वारंवार उल्लेख करु नका.

### घरातील मुलगा-सून

1) घरातील वृद्ध आई-वडीलांचा मान राखावा. त्यांना घरामध्ये दुय्यम दर्जाचे, निरुपयोगी असल्यासारखे स्थान ठेवू नये.
2) घरात त्यांच्याशी मोकळेपणाने बोलणे चालणे ठेवा.
3) त्यांच्या वागण्याबद्दल शेजाऱ्याजवळ कागाळ्या किंवा उणे-दुणे काढु नका. त्यांच्या ते कानावर जातेच व त्यामुळे घरातील असंतोषच वाढीस लागतो.

उर्वरीत भाग पुढील पानावर...

४) या तुमच्या वागण्याचा तुमच्या मुलांच्या कोवळ्या मनावर विपरीत परिणाम व्हायची शक्यता असते.

५) त्यांच्या व्यवहारावर बंधने घालू नका. त्यांना मोकळीक द्या.

**संकलन : महेश कुलकर्णी**
स्वयंसेवक, पुणे शहर

# <u>एक निवेदन</u> :

माया केअर फाऊंडेशन तर्फे जेष्ठ नागरिक संघासाठी/वृद्धाश्रमातील जेष्ठांसाठी योगासन प्रशिक्षण व त्यांच्या मनोरंजनासाठी नृत्य विद्या कार्यक्रमाचे आयोजन मोफत केले जाईल. तरी इच्छुक जेष्ठ नागरिक संघाने/वृद्धाश्रम चालकांनी आमच्या स्वयंसेवकांशी संपर्क साधावा, तसेच स्वयंसेवकांनी सुद्धा जेष्ठ नागरिक संघाशी संपर्क साधावा अशी नम्र विनंती.

# <u>एक नम्र आवाहन</u> :

न त्वहं कामये राज्यम । न च स्वर्गम नपुनर्भवं ।
कामये दु:खतप्तानां प्राणिनांम आर्तिनाशनाम ।।

– महाभारत

अर्थ : मला राज्य मिळविण्याची इच्छा नाही, मला स्वर्गात जाण्याची इच्छा नाही, मला पुनर्जन्म मिळावा अशी अभिलाषा नाही. मला फक्त दु:खाने तप्त झालेल्या प्राणिमात्रांचा त्रास नाहीसा करण्याची शक्ती दे.

The more we come out and do good to others, the more our heart will be purified and God will be in them.

**– Swami Vivekanand**

विज्ञानाच्या नवीन नवीन शोधाने माणसाचे आयुष्यमान दिवसेंदिवस वाढत चालले असून त्यामुळे जेष्ठ नागरिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांची उपयुक्तता संपलेली असून दोन पिढ्यातील अंतर, विभक्त कुटुंब पद्धती, मुलांचे परगावी अथवा परदेशी स्थलांतर आणि आर्थिक अडचणी यामुळे जेष्ठ नागरिकांना मदतीची आवश्यकता असते त्यांना शारीरिक तसेच मानसिक दृष्ट्या मदत करण्याची संधी माया केअर फाऊंडेशन आपणास देत आहे. आपण कोणीही असा, विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी किंवा उत्तम प्रकृती असलेले जेष्ठ नागरिक. आपण माया केअरचे स्वयंसेवक होऊन त्यांच्याच घरात जाऊन त्यांना मोफत मदतीचा हात देऊ शकता.

**<u>यासाठी संपर्क साधा :</u>**

1) www.mayacare.org
2) Mob. No. 9552510400 / 411

❋❋❋❋❋



आमचे स्वयंसेवक श्री दीपक भडकमकर श्री अरुण कानिटकर आणि अनुराधा कानिटकर यांना डायलिसिस उपचारानंतर सोबत करीत असतांना




पी वाय सी डेक्कन जिमखाना पुणे येथे भरलेल्या प्रदर्शनात माया केअर संस्थेची माहिती नागरिकांना देताना स्वयंसेविका प्रियांका लिखिते आणि स्वयंसेवक संतोष महाजन



आमचे पुण्याचे स्वयंसेवक श्री अवनिश ठाणावाला यांनी आंतरराष्ट्रिय योग दिनानिमित्त आनंद धाम जेष्ठ निवास येथे दत्त क्रिया योग याविषयी मार्गदर्शन व कार्यशाळा घेतली.



मातोश्री वृद्धाश्रम चंद्रपूर येथील जेष्ठांशी संवाद साधताना आमचे स्वयंसेवक विरेंद्र कैथल.



सोलापूर येथील आधार केअर सेंटर येथे भरतनाट्यमचा कार्यक्रम सुरु असताना.



माया केअर तर्फे भरतनाट्यम नृत्य कार्यक्रम मातोश्री वृद्धाश्रम कोल्हापूर येथे सुरु असताना



अमरावती येथील कांता निंबोरकर यांना आमचे स्वयंसेवक मंगेश मानेकर हे हॉस्पिटलमध्ये दाखल करत असताना.



आमचे जळगांवचे स्वयंसेवक अस्लम तडवी हे बहिणाबाई तडवी यांना वाचन करुन ऐकवत असतांना



आमचे नागपूरचे स्वयंसेवक निलेश ठाणेकर हे रवी मुडलियार यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले असतांना.



आमच्या मुंबईच्या स्वयंसेविका ईफा खान या वूई केअर वृद्धाश्रमातील आजींसोबत गप्पा मारतांना



औरंगाबाद येथील विठ्ठल राजले यांना मिनी बँकेतुन पैसे काढून देण्यासाठी मदत करताना आमचे स्वयंसेवक नितीन कपटी.



आमच्या यवतमाळच्या स्वयंसेविका प्रणाली ढाले या कुंडलिक कटाई यांना औषध गोळ्या पोहोच करत असतांना



आमचे सांगलीचे स्वयंसेवक अभिजीत सातपुते जनाबाई शेटे यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले असताना



माया केअरचे संस्थापिका डॉ. विद्या गोखले प्रथम स्मृतिदिनानिमित्त अण्णासाहेब बेहेरे जेष्ठ निवास खराडी, पुणे येथे भरतनाट्यम सादर करण्यात आले.



जुन्नर जि. पुणे आजादी का अमृत महोत्सव वृक्षारोपण प्रकल्पाअंतर्गत जेष्ठ महिलांसह वृक्षारोपण करताना स्वयंसेविका पूजा कंदारे



बावधन पुणे येथील आई वृद्धाश्रमात आमचे स्वयंसेवक श्री दिलीप उपासनी आणि स्वयंसेविका सोनाली देवगिरीकर यांनी श्री खेर याची विचारपूस करुन त्यांचे मनोगत लिहून घेतले.

Maya CARE Foundation

The next best thing to family

भावनिक / बौद्धिक / औपचारिक / समर्थन साठी
वरिष्ठ नागरिकांना मोफत 90 मिनीटांच्या भेटी

सेवा :
त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेट्स वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत करा.

## MAYA CARE FOUNDATION (INDIA) HELPLINE NUMBERS

| CITY | HELPLINE NO. |
| --- | --- |
| Pune, Mumbai, Kolhapur, Nagpur, Nasik, Sangli, Solapur Ahmednagar, Nandurbar, Aurangabad, Buldhana, Akola, Jalgaon, Amravati, Bhopal, Jodhpur, Halkhandi, Guwahati, Jalandhar, Udaypur. | 9552510400<br>9552510411<br>9623571845 |

Email : service@mayacare.org | More on www.mayacare.org

Merchant Name : MAYA CARE FOUNDATION
Mobile Number : 7721053535


✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई–मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE ACCOUNT : MAYA CARE FOUNDATION**

| | | |
| --- | --- | --- |
| NAME OF THE BANK | : | ICICI BANK LIMITED (BRANCH : TILAK ROAD, PUNE) |
| ACCOUNT NO. | : | 187501000462 |
| IFSC CODE | : | ICIC0001875 |

PRINTED MATTER
बुक–पोस्ट

FROM,


**माया केअर फाऊंडेशन**
१२१४, शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं. ०४, पुणे – ४११००२.


केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

To,
श्री/श्रीमती ____________________